# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 21/10/2020 (बुधवार)

(सायंकाळ)

---

### पोस्टे कुही परिसरातील चोरीच्या गून्हयातील आरोपी गजाआड स्थानीक गुन्हे शाखेची कार्यवाही

स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार यांना दिनांक 19/10/2020 रोजी खात्रीशीर गुप्त माहीतगारामार्फत माहीती मिळाली कि, पोस्टे कुही हददीतील अडवाणी धाबा, पाचगाव येथील खानावळ मध्ये स्वंयपाकी म्हणून काम करणारा अनिल चोरकर यांने कामगाराचे मोबाईल संच चोरी करून पसार झाला आहे.सायबर सेल नागपूर ग्रामिण यांचे मदतीने सदर आरोपीस सावनेर हददीत ताब्यात घेवून त्याचे जवळून तीन मोबाईल संच कि. 57,500/–रू. चा मुद्देमाल हस्तगत करून आरोपी व गून्हयातील मूददेमालसह पूढील कायदेशिर कारवाई कामी पोस्टे कुही यांचे ताब्यात देण्यात आले.

सदर कार्यवाही मा. श्री. राकेश ओला, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तसेच मा.श्री.माकणीकर , अपर पोलीस अधीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार यांचे आदेशाने सहा.पोलीस निरीक्षक जितेन्द्र वैरागडे सफौ/बाबा केचे ,पोहवा/संतोष पंधरे ,पोहवा/मदन आसतकर ,पोशि /राधेश्याम कांबळे ,बालाजी साखरे ,रोहन डाखोरे ,मपोशि/कविता बचले चापोहवा/भाउराव खंडाते यांचे पथकाने केली.



## नरखेड येथे सट्टापट्टी जुगार खेळविणाऱ्या आरोपीतांवर
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कार्यवाही

पो.स्टे. नरखेड :– दिनांक 20/10/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नरखेड परिसरात प्रोव्हीशन जुगार रेड कामी गेले असता त्यांना मुखबीर व्दारे मिळालेल्या खबर मिळाली की, काही इसम हे नरखेड टाऊन मध्ये मटका सट्टापट्टीचे आकडे लिहत आहे. यावरून पो. स्टे. नरखेड येथे आरोपीतांविरूद्ध एकुण दोन केसेस करण्यात आले आहे. आरोपी नामे क्र.1) संजय भोलाराम रॉय, वय 27 वर्ष, 2) प्रकाश गजबे, 3) प्रल्हाद भैय्यालाल उमाठे, वय 51 वर्ष व 4) शंकर काळे सर्व रा. नरखेड यांचे विरूद्ध कलम 12(अ) महाराष्ट्र जुगार बंदी कायदा सहकलम 109 भादवी. कायद्यान्वेय कार्यवाही करण्यात आली असून त्यांचे कडुन सट्टापट्टी जुगाराचे साहित्य व नगदी 7,268/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, मा. श्री. राहुल माकणीकर, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात श्री. अनिल जिटटावार पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सपोउपनि मायकल डॅनीयल, पोहवा राजेन्द्र सनोडिया, विजय डोंगरे, दुर्गाप्रसाद पारडे यांनी पार पाडली.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. उमरेड :– मृतक नामे– किशोर महादेव जाम्बुडे, वय 42 वर्ष, रा. गजानन नगर उमरेड हे उमरेड येथील ॲपेक्स बुलडेज कंपनित वेल्डर म्हणुन काम करीत होते. दि 09/10/20 चे 10.15 वा ते कंपनित वेल्डींगचे काम करीत असतांना त्यांच्या अंगावर लोखंडी जॉब पडल्याने त्यात ते बेशुध्द झाले. त्यांना उपचाराकरीता धंतोली नागपुर येथे न्युरॉन हॉस्पीटल येथे नेले असता उपचारा दरम्यान दि 20/10/20 चे 12.30 वा. त्यांचा मृत्यु झाला. सदर मर्गचे कागदपत्र प्राप्त झाल्याने मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रविण मारोतराव आगरकर, वय 43 वर्ष, रा. राउत लेआउट प्लॉट नं 10 झिंगाबाई टाकळी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार माहुरे 9657865201 हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 06 कि.मी अंतरावर मौजा केतापार शिवार येथे दिनांक 20/10/2020 चे 19:00 वा. ते दिनांक 21/10/2020 चे 07:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विक्रमकुमार अरविंदकुमार सिंह, वय 37 वर्ष, रा. आहोक पोस्ट विष्णूपुर आहोक जिल्हा बेगुसराय बिहार, ह मु. दिलीप बिल्डकॉम कंपनी प्लॉन्ट केतापार शिवार, ता. कळमेश्वर हे दिलीप बिल्डकॉम कंपनी मध्ये असिस्टन्ट मॅनेजर असुन सदर कंपनी चा प्लॅन्ट केतापार शिवारात आहे. अज्ञात आरोपीने दिलीप बिल्डकॉम कंपनी प्लॉन्ट केतापार चे कार्यालय मधील अकाउन्ट रुममध्ये रात्रीला स्लायडींग खिडकी मधुन प्रवेश करुन अकाउन्ट रुम मधील लोखंडी आलमारीचे लॉक तोडुन लॉकर तोडुन त्यामध्ये असलेले नगदी 3,70,000 /–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि राजीव कर्मलवार 9021452760 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर